# कांदळवनवारी

पर्यटन क्षेत्र आज विस्तारत आहे. निसर्ग पर्यटनामध्येही आज विविध प्रकार 'एक्सप्लोअर' केले जात आहे. त्यात कांदळवन पर्यटन हा दुर्लक्षित, परंतु सध्या जागरुकतेमुळे प्रसिद्ध झाले आहे. कांदळवन पर्यटन आणि त्याचे विविध पैलू आपण या लेखातून जाणून घेऊया...



सायली गुप्ते-जोशी



निसर्गाला न दुखवता त्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेणे म्हणजेच निसर्ग पर्यटन. पण खरंच हे इतकं साधं सोपं आहे का?... आहेही आणि नाहीही... कारण, 'एकमेकां साहाय्य करू अवघे करू पर्यटन' हे जमायला हवं. याचाच विचार करून २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'कांदळवन संवर्धन आणि उपजीविका निर्माण' योजना चालू केली. ज्यातून स्थानिक ग्रामस्थांना कांदळवन निसर्ग पर्यटनातून चरितार्थाची नवीन संधी उपलब्ध करून दिली गेली. यातून आज राज्यातील सर्व किनारी जिल्ह्यात मिळून एकूण नऊ गावांमध्ये कांदळवन निसर्ग पर्यटन सुरू झाले आहे.

आपली ही कांदळवनवारी आपल्या मुंबईपासूनच सुरू होते आणि महाराष्ट्राच्या दक्षिणेला असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात संपते. अगदी आपल्या हाकेच्या अंतरावर, आपल्या विरारमधल्या मारंबळपाडा येथे मुंबईतील पहिले कांदळवन निसर्ग पर्यटन आणि कांदळवन माहिती केंद्र आहे. इथले स्थानिकच तुमचे गाईड होतात आणि कांदळांच्या सौंदर्याची ओळख बोट सफरीतून करवून देतात. माहिती केंद्रातही हेच स्थानिक इथल्या जैवविविधतेशी परिचित करून देतात. हिरवीगार भातशेती, रम्य प्राचीन मंदिरे, खाडी आणि बेटाला गडद हिरवी किनार देणारी कांदळवने या सर्वांमुळे सिमेंटच्या जंगलांनी वेढलेला मारंबळपाडा आल्हाददायक दिसतो.



कांदळवन पर्यटनाव्यतिरिक्त, महाराष्ट्र शासनाच्या योजनेअंतर्गत शोभीवंत मत्स्यपालन, पिंजऱ्यातील मत्स्यपालन इत्यादीसारखे 'उपजीविका प्रकल्प' ही स्थानिकांच्या सहभागाने केले जात आहेत.

मारंबळपाड्यावरून महाराष्ट्राच्या दक्षिणेकडे जाताच रायगडमधल्या दिवे आगर गावात या कांदळवन सफरीशी भेट होते. पांडव कालीन इतिहासाचा वारसा, दैवी वास्तव्य व सुवर्ण गणेशाचे गाव अशा नावांनी प्रसिद्ध असलेले हे गाव कांदळवन, सुदंर समुद्र किनारा व त्यावर अंडी घालायला येणारी समुद्री कासवे आणि पक्ष्यांच्या विविध प्रजातींनीही समृद्ध आहे आणि म्हणूनच पर्यटकांना विशेष पसंतही आहे. हा नैसर्गिक वारसा जपण्याकरिता स्थानिक कासव महोत्सव, कांदळवन सफारी, पक्षी निरीक्षण, समुद्र सैर आणि सांस्कृतिक वारसा जपून जनजागृती करण्याचे काम करतात.

रायगडमधलेच दुसरे कांदळ गाव म्हणजे काळिंजे. श्रीवर्धन तालुक्यातील या गावाला १९० हेक्टरचे ११ प्रमुख कांदळ प्रजाती व पाच संलग्न प्रजातींनी नटलेलं विस्तीर्ण कांदळवन लाभलं आहे. या गावच्या



हद्दीतील खाडीच्या मध्यभागी कांदळवनांनी आच्छादलेलं सुंदर बेट आहे. बेटावर जुनी वस्ती, गुरांचे गोठे, आंबा-बोरांची झाडे, नारळ व सुपारीच्या बागा, वटवाघळांची वस्ती आहेच, पण रानडुक्कर व कोल्हा यासारख्या प्राण्यांचाही अधिवास आहे. निसर्गाच्या अद्भुततेच उदाहरण म्हणजे चारही बाजूंनी खाऱ्यापाण्याने वेढलेल्या या बेटावर गोड्या पाण्याच्या विहिरी पाहायला मिळतात. बेटाला लागूनच कांदळवन रोपवाटिका आणि वाळूची पुळन आहे. या पुळणीवरील पसरलेली कांदळवनाची लांबच-लाब मूळं पाहायला वेगळीच मज्जा येते. नुसतं वनस्पती सौंदर्यच नाही, तर इथे प्राणी सौंदर्यही अफाट आहे. उदमांजर (पाणमांजर) ज्याला इंग्रजीत 'ऑटर' म्हणतात यासारख्या लाजाळू प्राण्याला आश्रय देणार हे गाव ८५ हून अधिक पक्षी प्रजातींचं घर आहे. यात 'लिफ बर्ड' (पर्ण पक्षी), 'इंडियन पॅराडाईज फ्लाय कॅचर' (स्वर्गीय नर्तक), 'पाईड हॉर्नबील' (धनेश), 'ब्लॅक कॅप किंगफिशर' (काळ्या टोपीचा धीवर) अशी अनेक नावे घेता येतील. या सगळ्यामुळेच शहराकडे जाणारे गावातले तरुण गावात राहूनच इथल्या निसर्ग संपदेची ओळख पर्यटकांना करवून आपला उदरनिर्वाह करतायत. यात ते मॅंग्रोव्ह बोट सफारी, मॅंग्रोव्ह ट्रेल, कांदळवन रोपवाटिकेला भेट, जंगलातील व बेटावरील पक्षी निरीक्षण, पारंपरिक मासेमारी व अँगलिंग, पंचक्रोशीतील आकर्षक स्थळांना भेट अशा अनेक पर्यटन सुविधा पुरवतात. या गावाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रातील पहिलं मॅंग्रोव्ह कयाकिंग इथेच सुरू झालय आणि पर्यटकांच्या आकर्षणाचं कारणही बनतय. पर्यटकांच्या राहण्याची सोयही गावातच होते, स्थानिकांनी तयार केलेल्या 'होम-स्टे'मध्ये...

रत्नागिरी तालुक्यात शिरताच आंजर्ले गावच्या कांदळवनांची महती कानावर पडायला सुरुवात होते. दापोलीतील जोग नदीच्या मुखाजवळ वसलेलं आणि खडकावरच्या गणपतीमुळे प्रसिद्ध असलेलं हे गाव. याला एका बाजूने डोंगर तर दुसऱ्याबाजूने सुंदर समुद्र किनाऱ्याची झालर आहे. डोंगर भागात ससे, कोल्हे, रानडुक्कर, सालजीव, काळमांजर बघायला मिळतात. विशेष म्हणजे पावसाळ्यात महाराष्ट्रात स्थलांतर करून येणारा सुंदर तिबोटी खंड्याही (ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर) या गावाला भेट देतो. इतर प्रकारचे खंड्या, धनेश, समुद्रावर राज्य करणारा समुद्र गरुड असे अनेक पक्षी या गावचे स्थानिक आहेत. पण याचं मुख्य वैशिष्ट्य आहे ते म्हणजे इथल्या वाळूत नोव्हेंबर ते मार्च दरम्यान अंडी घालायला येणारी समुद्री कासव. समुद्री कासवांतील सगळ्यात लहान प्रजाती ऑलिव्ह रिडली कासव. 'सब साथ तो डर की क्या बात' म्हणत सर्व गावकऱ्यांनी एकत्र येऊन या कासवांना आपल्या किनाऱ्यांवर अभय दिलय आणि त्यांना हानी पोहोचवू शकणाऱ्या गाड्यांना सपशेल रोख लावलीये.

इतकच नाही, तर गावातील तरुण कासवमित्र बनून या घरट्यांचे रक्षण करतात. या कासवांविषयी जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायत व वन विभागासोबत मिळून कासव महोत्सव साजरा करतात. पर्यटकांना कासवाच्या अंड्यामधून बाहेर येणारी पिल्ले सुरक्षित पणे समुद्राकडे रवाना होताना पाहायला मिळतात. यातून हे गावकरी स्वःसाठी उपजीविका आणि निर्सगाला संरक्षण पुरवत समर्थ निसर्ग पर्यटन करतात.

पुढे येतं खेड तालुक्यातील वाशिष्ठी नदीच्या किनाऱ्यावरचं सोनगांव. खारफुटीचे जंगल आणि नदीच्या पात्रातील मगरींचे वास्तव्य हे याचं आकर्षण. स्थानिकांनी याच मगरींना आपल्या रोजीरोटीचं साधन बनवलंय मगर सफारी सुरू करून. रम्य कांदळवनांतून वाहणाऱ्या खाडीतील पक्षी आणि कांदळवन संपदा बघण्यात रमलेल्या पर्टकांना नदीतील बेटावर सूर्यस्नान करणाऱ्या मगरींना बघताच होणारा आनंद अतुलनीयच आहे.

आता तळ कोकणातला सिंधुदुर्ग जिल्हा. तसं इथल्या सगळ्याच गावात कांदळवन आहे, पण ही चार गावं फार विशेष आहेत. त्यातील तारामुंबरी आणि मिठमुंबरी या द्गगड तालुक्यातील दोन शेजारणी आपल्याला वेगळ्याच दुनियेत घेऊन जातात.

मी तुम्हाला महाराष्ट्रात परदेशी किनारे दाखवते म्हटलं तर विश्वास ठेवाल? अर्थात नाही, पण तारामुंबरीचा किनारा तुम्हाला परदेशी किनाऱ्यांचा आनंद देईल, यात काही शंका नाही. समुद्र आणि खाडीच्या मुखावर वसलेलं हे गाव पर्यटकांना आनंदित करून जातं. इथल्या स्वच्छ पाण्यात 'स्नॉर्कलिंग'चाही अनोखा अनुभव पर्यटक घेतात. कायाकींग, पक्षी निरीक्षण हे उपक्रम तर आहेतच पण या गावात स्थानिक वन विभागाच्या मदतीने करत असलेल्या शाश्वत मासेसारी प्रकल्पही जसे कालवे पालन, शिणाने पालन, शोभीवंत मत्स्यशेती आहेत. या गटांच्या विशेष भेटींची आणि हे प्रकल्प पाहण्याची सोयही पर्यटकांसाठी केली जाते. मालवणी जेवणाशिवाय सिंधुदुर्ग यात्रा अपुरीच म्हणूनच अस्सल मालवणी पद्धतीच्या जेवणाचीही उत्तम सोय पर्यटकांकरिता ग़ावकऱ्याकडून केली जाते.

तारामुबराप्रमाणेच मिठमुंबरीतही बचत गटाद्वारे पर्यटकांना बोटीने कांदळवनाची सफर करवली जाते. हा महिला गट असून हे सदस्य पर्यटकांना कांदळवन प्रजातींची माहिती व त्यांचे औषधी उपयोग, कांदळवनात आढळणारे पक्षी, मासे यांची माहिती देतात व येथील कालवे पालन, शिणाने पालन यांसारख्या शाश्वत मत्स्य प्रकल्पांचीही माहिती देतात.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्याने नटलेलं अजून एक गाव आचरा. हे गाव पुरातन मंदिरे व ऐतिहासिक वास्तू यांनी समृद्ध आहेच, पण त्याचबरोबर सागरिका महिला बचत गटाच्या अनोख्या कांदळवन पर्यटन उपक्रमामुळेही गाजत आहे. यामध्ये कांदळवन बोट सफारी, कांदळवनातून फेरफटका व त्यातून पर्यटकांना कांदळवनाच्या प्रजातींची माहिती, त्यांची इंग्रजी नावे, त्यांचे औषधी उपयोग, तेथील पक्षी मासे यांची विस्तृत माहिती त्या देतात. तसेच खेकडा पालन, शिंपले पालन, शोभीवंत मत्स्यपालन यासारख्या प्रकल्पांचीही माहिती देतात. या महिला बचत गटची खासियत म्हणजे विविध प्रकारचे मत्स्य पदार्थ! त्यांनी बनवलेले मास्यांचे स्थानिक पदार्थ, लोणची, चटण्या यांची जिभेवर रेंगाळणारी चव एकदातरी चाखावीच.

आपल्या कांदळवारीचा शेवटचा थांबा आहे वेंगुर्ल्यातील निवती गाव. एका बाजूला अथांग पसरलेल्या निळाशार अरबी समुद्राचा रुपेरी सागरकिनारा तर दुसऱ्या बाजूला कांदळवनाने नटलेली व जैवविविधतेच्या निसर्ग सौंदर्यांची उधळण करणारी खाडी असे हे गाव. डॉल्फिन सफारीसाठी प्रसिद्ध असलेल्या या गावाने आता कांदळवन पर्यटनाची कास धरली आहे. कांदळवन बोट सफारी, पक्षी निरीक्षण असे उपक्रम राबवत खाडीमधील बेटा भोवतीच्या कांदळवनांच्या विविध प्रजाती, स्थानिक व स्थलांतरित पक्षी, पाण्यातील विविध जैवविविधता याचे दर्शन पर्यटकांना घडवत आहे. गावामधे पर्यटकांच्या राहण्याची व जेवणाची उत्तम सोय केलेली आहे. हे गाव छोटे असले तरी पर्यटन व सांस्कृतिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर मानले जाते.

पूर्वी पडीक, निकामी आणि त्रासदायक वाटणारं हे कांदळवन आता अनेक जीवांचं पोषणकर्ता झालंय. याच्या सौंदर्याची महती सांग़त, दाखवत अनेक लोक आपली उपजीविका आणि जीवसृष्टी याचं संतुलन आणि संगोपन करत आहेत. आता कांदळवन शाप नाही, वरदान झालंय.

